आतील पानांत रायगडात पिकली पिवळी कलिंगडे, 'आरोही' वाण ठरतोय आकर्षणाचे केंद्र/५

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २४०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, १९ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

# पनवेल मनपा स्थायी, महिला व बालकल्याण सभापतींची निवड

## ■ बबन मुकादम आणि ममता म्हात्रे बिनविरोध





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी बबन नामदेव मुकादम यांची तर महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी ममता प्रितम म्हात्रे यांची निवड विशेष सभेत करण्यात आली.

क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे पार पडलेल्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी पीठासीन अधिकारी रणजित यादव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे हे होते. पीठासीन अधिकाऱ्यांसह पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे यांच्या उपस्थितीत संबंधित समित्यांच्या सदस्यांमधून नियमानुसार ही निवड प्रक्रिया झाली.

महापालिका सचिव यांच्याकडे १७ मार्च २०२६ रोजी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जांच्या छाननी प्रक्रियेनंतर निवड प्रक्रिया पार पडली. दोनही समित्यांच्या सभापती पदासाठी प्रत्येकी एकच अर्ज प्राप्त झाल्याने बिनविरोध निवड झाली. स्थायी समिती सभापतीपदी बबन नामदेव मुकादम यांची तर महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी ममता प्रितम म्हात्रे यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा पीठासीन अधिकारी अधिकारी रणजित यादव यांचेकडून करण्यात आली. एक वर्षासाठी ही निवड करण्यात आली आहे.

# एक्सप्रेस वेवर भीषण अपघात

## ▌ तीन जणांचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर बुधवारी सकाळी एका कंटेनरने समोरील पाच वाहनांना जोरदार धडक देऊन भीषण अपघात झाला असून या अपघातात इनोव्हा कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला तर टाटा टिगारो कारमधील चार जण जण जखमी झाले आहेत. या अपघातात कंटेनरने समोरील पाच वाहनांना जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला आहे. यात तीन कार एक आयशर टेम्पो आणि एक बल्कर असा सहा वाहनांचा समावेश आहे.

मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवरून कंटेनर चालक अवधेश यादव (वय ३७, रा सारजा अझमगड उत्तर प्रदेश) हा आपल्या ताब्यातील कंटेनर घेऊन पुण्याहून मुंबईकडे जाताना तो बोरघाटातील खोपोली एक्सिट जवळ आला असता **(पान २ वर..)**














दिल्ली : भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांची पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांनी राज्याचे कॅबिनेटमंत्री आशिष शेलार यांच्यासमवेत सदिच्छा भेट घेतली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या, युनेस्कोचा जागतिक दर्जा प्राप्त १२ गड-किल्ल्यांवरील 'मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया' हे पुस्तक त्यांना भेट दिले तसेच राज्यसभा खासदारपदी झालेल्या बिनविरोध निवडीसाठी त्यांचे अभिनंदन केले.

## फळ मार्केटमध्ये मोठी कारवाई

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने फळ मार्केटमध्ये मोठी कारवाई करत ७९१ आणि ७९२ क्रमांकाचे दोन गाळे सील केले आहेत. संबंधित गाळेधारक स्वतः व्यापार न करता ते इतरांना भाड्याने देऊन अनधिकृत पद्धतीने शेतमालाचा व्यापार करण्यास परवानगी देत असल्याचे उघड झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

मुंबई एपीएमसी होलसेल फळ मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत व्यापार सुरू असून अनेक व्यापाऱ्यांनी आपले गाळे भाड्याने दिल्याचे समोर आले आहे. विशेषतः प्रशासनाकडून जे कारवाई करण्यात आली आहे ती एम विंगमधील दोन गाळ्यांमध्ये ८ ते १० जणांना बसवून त्यांच्याकडून व्यापार करून घेतला जात होता. या लोकांकडे व्यापारासाठी कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती. गाळा एकाचा, परवानगी एकाची व्यवसाय करतात तिसरा असा खेळ सुरू आहे. ज्याच्या नावावर गाळा आहे तो व्यापार न करता प्रत्यक्षात दुसरेच लोक त्यामध्ये व्यवसाय करत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आणि गळा धारक या लोकाकडून लाखो रुपये भाडे घेत होते.

सध्या दोन गाळ्यांवर कारवाई झाली असली तरी मार्केटमधील उर्वरित अनधिकृत व्यापारावर प्रशासन कधी कारवाई करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहेत.

पान १ वरून..

## एक्सप्रेस वेवर भीषण अपघात

चालकाचे कंटेनर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील टाटा पंच कारला जोरदार ठोकर मारून तिच्या पुढे असलेल्या टाटा टीगारो कारला जोरदार धडक दिली, तर टाटा टीगारो कारच्या पुढे असलेल्या असलेल्या आयसर टेम्पोला जोरदार धडक देऊन कंटेनर पुढे जाऊन इनोव्हा कारला पाठीमागून जोरदार धडक देऊन इनोव्हा कारवर कंटेनर उलटला, तर पुढे असलेल्या बलकरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने सहा वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे.


या अपघातात इनोव्ह कारमधील श्रीकांत अनंत जाधव (वय ६३, रा गिरीजा शंकर विहार पुणे) अंबादास दामू पेटारे सिहंगड रोड हिंगणे पुणे) प्रमोद संतोष पवार या तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर टाटा टिगारो कारमधील स्वप्नील नामदेव भुजबळ, नवनाथ भुजबळ, अक्षय गायकवाड, भानुदास गायकवाड, आणि कंटेनर चालक अवधेश यादव हे जखमी झाले आहेत, तर या अपघातातील सहा वाहनांचा चक्काचूर झाला आहे,

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, खोपोली पोलीस, आयआरबी पेट्रोलिंग, अपघातग्रस्त टीमचे सदस्य, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, मृत्युजय टीम आदी तत्काळ घटनास्थळी दाखल होत कार मध्ये अडकलेल्या प्रवाशांना तत्काळ बाहेर काढून पुढील उपचारासाठी खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले तर तीन जणांचे मृतदेह खालापूर येथे शवविच्छेदनासाठी पाठविले आहेत, तर सगळी वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेऊन एक्सप्रेसवे वाहतुकीसाठी चालू करण्यात आला आहे.



















HAPPY GUDI PADWA
SAMARTH
(Prabhu Ali, Panvel)
GANESH KRUPA
(Opp. Nadkarni Hospital, Panvel)
JANKI
(S. N. Road, Panvel)
SHRADDHA
(Natyagriha Road, Panvel)
Your own world of Happiness
SNEHSHREE
(Natyagriha Road, Panvel)
+91-99304 99909
+91-99304 99099
+91-80802 57175
+91-80808 65909
NEELKANTH GROUP
O: Neelkanth Group, Office No. 706-710, 7th Floor, Neelkanth Landmark, Plot No. 365/1/2,
Mumbai - Pune Highway, Behind Orion Mall, Panvel - 410206.
E Mail : neelkanthassociates9099@gmail.com | neelkanthconstructions.group@gmail.com


चैत्र पालवीचा सण हा खास,
सुख समृध्दीची गुढी ऊभारु दारी आज
नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
PHV
Since 1940
मे. पांडुरंग हरी वैद्य ज्वेलर्स
(S.M.P.)
phvs.panvel
संजय मोरेश्वर पोतदार ग्रुप व्हेंचर
शॉप नं १, कर्नाळा रॉयल, एम.टी.एन.एलच्या बाजुला, पनवेल, फोन: 8591 841 575 / 9594 899 589
• दादर(प) • अलिबाग


भा.ज.पा.
जे एम म्हात्रे
चॅरिटेबल संस्था
गुढी पाडवा
नववर्ष
निमित्त सर्व बंधू भगिनींना
मंगलमय शुभेच्छा!
श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे
मा.विरोधीपक्ष नेता, पनवेल महानगरपालिका
सौ.ममता प्रितम म्हात्रे
सभापती.महिला-बालकल्याण समिती. प.म.पा.
जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था | जे एम म्हात्रे इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड

## संपादकीय

# कठोर शिक्षेची गरज

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात वडगाव पान गावात मंगळवारी दुपारी शाळेतून घरी परतणाऱ्या सहावीतील मुलीवर ॲसिड हल्ला झाला. या घटनेमुळे राज्यातील ग्रामीण भागातील शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न चर्चेत आला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या पुरुषांना कायद्याचे भय वाटत नाही हे अशा घटना राजरोस घडतात यातून पुरेसे स्पष्ट दिसते.

**ग्रामीण भागात मोठ्या संख्येने मुली चालत व सायकलवरून दूरवरच्या शाळांना जात असतात. सुरक्षिततेच्या गरजेपोटी त्या शक्यतो दोनचार जणी मिळूनच येजा करत असल्या तरी ग्रामीण भागांत वस्त्यावस्त्यांतील अंतर मोठे असल्याने बहुतेक जणींना थोडेफार तरी अंतर एकटीने कापावे लागते. आपल्या पाल्याला शाळेत नेऊन सोडावे-आणावे हे शेतमजुरी वा तत्सम कामांत गुंतलेल्या ग्रामीण पालकांना परवडणारे नसते. अशा परिस्थितीत असल्या हल्ल्यांतील गुन्हेगार मोकाट राहिल्यास गुन्हेगारी प्रवृत्तीला बळच मिळेल. ॲसिड हल्ल्याची समस्या जुनीच असून निष्पाप तरुणींचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या समस्येवर कठोर उपाययोजनेची मागणी दीर्घकाळ होत आली आहे. गुन्हेगारांना सहजपणे ॲसिड उपलब्ध होतेच कसे हा प्रश्न गेली कितीतरी वर्षे पुन्हा पुन्हा विचारला गेला आहे. सिडच्या उपलब्धतेवर कठोर नियमांचा अंकुश हवा अशी मागणी दीर्घकाळापासून केली गेली आहे, परंतु कागदावरच्या नियमांना बगल देऊन नको त्या व्यक्तींच्या हातात ॲसिड सहज पोहचतेच आहे. निव्वळ पुरुषी अहंकार दुखावल्यामुळे संबंधित स्त्रीला आयुष्यभराची अद्दल घडवण्याच्या क्रूर मानसिकतेतून बहुतेकदा सिड हल्ले होतात, परंतु सहावीत शिकणाऱ्या शाळकरी मुलीवर असा हल्ला व्हावा हे धक्कादायकच आहे. उन्हाळ्यामुळे शाळा काहिशी लवकर सुटल्यानंतर दुपारी साडेअकरा-बाराच्या सुमारास सायकलवरून घरी चाललेल्या त्या १३ वर्षांच्या मुलीला दुचाकीवरील दोघा अज्ञात व्यक्तींनी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले आणि तिच्या काही ध्यानात येण्याच्या आतच तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपलेली ही मुलगी आईसोबत मामाच्या घरी राहते. तिच्यावर अशातऱ्हेचा क्रूर हल्ला कुणी का करावा असा प्रश्न तिच्या आईलाच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राला पडला आहे. अकस्मात झालेल्या हल्ल्यानंतर मुलीने वेदनेने किंकाळी फोडल्यानंतर स्थानिक नागरिक धावत आले, परंतु ते घटनास्थळी पोहचण्यापूर्वीच हल्लेखोरांनी दुचाकीवरून पळ काढला होता. ॲसिडमुळे मुलीचा चेहरा आणि शरीर गंभीररित्या भाजले असून तिला लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. विधिमंडळ अधिवेशनादरम्यान ही घटना घडल्याने स्वाभाविकच सभागृहात त्यावर चर्चा झाली. सरकारकडून पोलिसांना तपासाच्या कडक सूचनाही दिल्या गेल्या आहेत. ग्रामीण भाग असल्याने घटना घडली त्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. आरोपी स्थानिक असण्याची शक्यता ध्यानात घेऊन पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला आहे. दोनच दिवसांपूर्वी त्याच तालुक्यातील रणखांब गावात लग्नास नकार दिला म्हणून अन्य एका तरुणीवर हल्ला झाला होता. ती घटना ताजी असतानाच या चिमुकलीवर ॲसिड हल्ला झाल्याने परिसरातील शाळकरी मुली व पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ॲसिड हल्ले, बलात्कार, लैंगिक शोषण या स्वरुपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण पाहता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या पुरुषांना कायद्याचे, शिक्षेचे भय का वाटत नाही हे तपासून अशा प्रकरणांत अतिशय वेगाने न्याय व्हायला हवा व कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. मुली व स्त्रियांना सुरक्षितपणे घराबाहेर वावरणे शक्य करण्यासाठी परिस्थितीत लक्षणीय बदल व्हायला हवा हे निश्चित.**

# स्वच्छता दूतांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा

पनवेल महानगरपालिकेतर्फे रोडपाली येथे कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' अंतर्गत प्रभाग क्रमांक ७, ८, ९ व १० मधील स्वच्छता दूत (सफाई मित्र) यांच्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्षमता बांधणी' कार्यशाळेचे आयोजन रोडपाली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले.

उपायुक्त डॉ वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार या कार्यशाळेत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता वाढीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. यावेळी हायफीड ऑरनेट टेक्नॉलॉजी यांच्या वतीने तिक्षला गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची कामांशी संबंधित विविध महत्त्वाच्या बाबींवर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये रस्ता सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसंदर्भातील उपाययोजना, ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व, महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षेबाबत माहिती तसेच मलनिस्सारण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य आणि सुरक्षा विषयक मार्गदर्शन यांचा समावेश होता.

या उपक्रमामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौशल्य वृद्धिंगत होणार आहे. या कार्यशाळेमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेत अधिक कार्यक्षमतेने योगदान देता येणार असल्याचा विश्वास स्वच्छता कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, दिग्नेश भोईर, अमोल कांबळे, अमित जाधव तसेच सर्व सुपरवायझर उपस्थित होते. महिला व पुरुष स्वच्छता दूत तसेच नागरिकांनीही कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# स्पेस वर्ल्ड प्रकल्पाच्या बुकिंग ऑफिसला भीषण आग

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ - कशेळे राज्य मार्गावरील अंजप गावा शेजारी असलेल्या स्पेस वर्ल्ड या घरकुल प्रकल्पाच्या बुकिंग कार्यालयाला अचानक आग लागल्याची घटना दुपारच्या सुमारास घडली. या आगीत कार्यालय पूर्णतः जळून खाक झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



दुपारच्या सुमारास आग लागली तेंव्हा कार्यालय बंद अवस्थेत होते. त्यामुळे आत कुणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. आगीने परिसरातील गवत व वनसंपदेलाही वेढा घातल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ पुढाकार घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला.

घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्यात आला आहे. तसेच सदर गृहप्रकल्पाच्या मालकालाही घटनेची माहिती देण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे.

# अन्नपदार्थ विक्रेत्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, कळंबोली, नवीन पनवेल, खांदा वसाहत परिसरातील सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न व औषध प्रशासन तर्फे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले .

अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ व विनियमन २०११ फोस्टॅक ट्रेनिगबाबत पनवेल शहरातील हॉटेल सुरुची बॅन्क्वेट हॉल येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले . यावेळी पदनिर्देशित अधिकारी तथा कार्यालय प्रमुख अन्न व औषध प्रशासन ( महाराष्ट्र राज्य ) नि.डी .मोहिते मोहिते व अन्नसुरक्षा अधिकारी श्री. निकम यांनी उपस्थितीत ७० व्यावसायिकांना मार्गदर्शन केले.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक राजू सोनी यांची उपस्थिती महत्वाची होती .तसेच हॉटेल सुरुची बॅन्क्वेट हॉलचे अनिल शेणॉय हे सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी केंद्रीय अन्न सुरक्षा मानदे प्राधिकरणाच्या ईट राईट Initative या उपक्रमांतर्गत अन्नपदार्थाचे सुरक्षित उत्पादन व हाताळणी याबाबत अन्नपदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींसाठी FOST-C ट्रेनिंग घेणे आवश्यक आहे. सदर बाबत संपूर्ण माहिती www.eatrightindia.gov.in व www.fostac.fssai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रशिक्षण अन्न व औषध प्रशासन, म. राज्य प्रशासनामार्फत केंद्र शासनाचे मान्यता प्राप्त थर्ड पार्टी ऑडिटरकडून देण्यात येणार आहे.

या बाबत केंद्रशासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती सुद्धा देण्यात आली. यावेळी उपस्थितांना नगरसेवक राजू सोनी यांनीसुद्धा उपयुक्त असे मार्गदर्शन केले.

# इसांबे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे समीर देवघरे बिनविरोध

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापुर तालुक्यातील ग्रूप ग्राम पंचायत इसांबे उपसरपंच पदावर समिर नामदेव देवघरे ह्यांची खेळी मेळीच्या वातावरणामध्ये एकमताने बिनविरोध निवड करण्यात आल्यामुळे सर्व स्थरातून कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.

या अगोदर उप सरपंच पदाचा कार्यभाग सचिन थोरवे हे सांभाळीत होते, मात्र आपला कार्यकाळ पूर्ण होतच उप सरपंच पदाचा राजीनामा देण्यात आला. यावेळी रिक्त झालेल्या उपसरपंचपदाच्या निवडीसाठी ग्रामपंचायतीची विशेष सभा आयोजित करण्यात आली.



ग्रुप ग्राम पंचायत इसांबे सरपंच हिरामण हिलम, उप सरपंच सचिन थोरवे, ग्रामसेवक आशिष नागरे, सदस्या मयुरी देवघरे, सारिका शिनगारे, नम्रता हुशार, ज्योती पाटील, सदस्य - वामन वाघे यांच्या सर्वांच्या मते उपसरपंच पदासाठी समीर देवघरे ह्यांचे नाव सुचविले. यावेळी सर्वांनी त्यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी या परिसरातील शेकडो कार्यकर्ते, मान्यवर उपस्थित, कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतषबाजी करत एकच जल्लोष करण्यांत आला.

## निवडक

### महिलेकडून गांजा जप्त


**पनवेल :** एका ७० वर्षीय वृद्ध महिलेकडून खांदेश्वर पोलिसांनी गांजा हा अमली पदार्थ जप्त केला आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पनवेल रेल्वे स्थानकाजवळील पंचशील नगरात राहणाऱ्या एका ७० वर्षीय महिले कडून ३२० ग्रॅम वजनाचा गांजा ज्याची किंमत जवळपास ६,८०० रुपये इतकी आहे.

### कोंडले येथे रामनवमी

**पनवेल :** तालुक्यातील कोंडले दरवर्षी प्रमाणे २६ मार्च ते २७ श्रीराम नववी उत्सव सोहळा येथे साजरा होणार आहे या कालावधीत कीर्तने पालखी जोड भजने हरिपाठ भागवताचार्य काकड आरती इत्यादी कार्यक्रम होणार आहे. यावेळी आजूबाजूच्या गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित असतात अतिशय मोठ्या संख्येने नागरिक व उत्सव साजरा होत असतो असे आव्हान रवी पाटील यांनी केले आहे.

### वृद्ध महिला बेपत्ता

**पनवेल :** ७८ वर्षीय एक वृद्ध महिला राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विजया दिनकर वानखडे वय ७८ वर्ष, उंची पाच फुट दोन इंच, रंग- सावळा, बांधा- सडपातळ, चेहरा गोल, नाक-नकटे अंगात नेसणीस पिवळया रंगाची साडी त्यावर लाल रंगाचे टिपके, सफेद रंगाचा ब्लाउज, व जांभळ्या रंगाची पर्स, सोबत मोबाईल फोन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा सपोनि कृष्णा पाटील (७०२१२०२०७५) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# हॉटेलमधील बिलाच्या वादातून तरुणाचा मॅनेजरवर तलवारीने हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील कामोठे वसाहतींमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील हॉटेलमध्ये घुसून एका तरुणाने तलवारीने हल्ला केल्याची घटना घडली आहे.

ही घटना कामोठे सेक्टर-६ मधील सरोवर हॉटेलमध्ये घडली आहे. संबंधित तरुण तलवार घेऊन हॉटेलमध्ये घुसला आणि हॉटेल मॅनेजर उमेश शेट्टी यांच्या छातीवर वार केला. त्यानंतर त्याने काउंटरवरही ताबडतोब हल्ला चढवला.

या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे हॉटेलमध्ये एकच गोंधळ उडाला. उपस्थित ग्राहकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव करत पळ काढला. सदर संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक दिवस आधी झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे कामोठे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



**पनवेल : गुढीपाडवा, प्रवेश वाढवा या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिकेच्या गुजराती शाळा येथे पालक शाळा घेण्यात आली. तसेच इयत्ता पहिलीमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेविका दर्शना भोईर यांची उपस्थिती लाभली.**

# महात्मा फुले महाविद्यालयामध्ये रयत माऊलींची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे १८ मार्च २०२६ रोजी रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची ९६ वी पुण्यतिथी अत्यंत श्रद्धाभावाने व करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर साहेब होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमास माजी उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील उपस्थित होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन बोलताना प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर साहेब यांनी कर्मवीरांच्या विचारांचा उल्लेख करत रयत माऊलींच्या कार्याची महती सांगत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी केलेल्या त्यांच्या जीवनातील संघर्ष, त्याग, अनाथ मुलांसाठी पनाला लावलेले सर्वस्व सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील यांनी आपल्या भाषणात रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या जीवनातील विविध कार्यांचा आणि प्रसंगांचा उल्लेख केला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी तेजस्विनी या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अविष्कार प्रकल्पामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.पी. म्हात्रे, डॉ. लक्ष्मण गवळी, रजिस्ट्रार अनंता जाधव, सुनिता काटकर, ललिता अवचिते, डॉ. लीना मेश्राम, प्रा. सतीश ढगे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयातील स्वरमय ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी रयत गीत सादर केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रविण गायकर यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, डॉ. यशवंत उलवेकर यांनी केले. शेवटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.पी. म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या प्रकारे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम अत्यंत श्रद्धा, आदर आणि प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

# प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरेपाडा येथील प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, अंकन कुमार सहा, अनंता गडगे, सरपंच प्रकाश घाडगे, हनुमान खुटले, एडवोकेट विजय हरळकर, प्रकाश बिनेदार, धीरेंद्र ठाकूर, मयूर गडगे, माजी उपसरपंच वंदना रोडपालकर, धनश्री खूटले, महेश पाटील, मयूर गडगे आदी उपस्थित होते.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली कला कौशल्य सादर केली. यावेळी संदेश गायकवाड तसेच डॉक्टर वैभव खुटले यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. शाळेचे चेअरमन रायगड भूषण धनंजय खुटले आणि प्रिन्सिपल श्रद्धा ठाकूर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

# पनवेलमध्ये महिला गौरव सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळ व पनवेल तालुका निवृत्त सेवक मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला गौरव सोहळा पनवेल उरण आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. गौरव सोहळ्यास मार्गदर्शन करताना मंडळाचे सचिव बी.पी. म्हात्रे यांनी दोन्ही मंडळांच्या कार्याचा आढावा घेतला.



प्रमुख पाहुणे डॉ. समिधा गांधी यांनी आपले सासरे डॉ. प्रभाकर गांधी व लोकनेते दि.बा. पाटील यांच्या स्नेहाची आठवण करून देत कार्याचा गौरव केला. डॉ. संजीवनी गुणे यांनी, महिलांनी आपल्या कुटुंब स्वास्थ्याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे. आपल्या आरोग्याला जपा, असा मंत्र दिला.

खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी निरनिराळ्या गुन्ह्यांचा व ते कसे टाळता येतील याबद्दल सांगितले. निवृत्त सेवक मंडळाचे अध्यक्ष के. एल. जाधव यांनी महिलादिनाबद्दल माहिती दिली. समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांनी मंडळाच्या कार्याचा गौरव केला. मंडळाच्या उपक्रमात सातत्याने सहभागी होणाऱ्या १०० हून अधिक महिलांना सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन विजय द. गायकर व शरद म्हात्रे यांनी केले. मंडळाचे उपाध्यक्ष जे.डी. तांडेल यांनीआभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवदास पालकर, स.क. पाटील, दत्तात्रय जाधव, वसुधा नवाळे, वंदना पाटील, वैशाली म्हात्रे, सुनंदा पाटील, कमल रसाळ, रजनी भालेराव, प्रमोद म्हात्रे, विजया पाटील, कल्पना म्हात्रे, विद्याधर पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# उसर-पोयनाड मार्गाच्या कामाला गती

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील उसर – पोयनाड दरम्यान बैलखिंड मार्गे रस्त्याच्या कमला गती मिळाली आहे. या मिसिंग लिंक प्रकल्पामुळे उसर ते पोयनाड हे अंतर १५ किलोमीटरने कमी जाणार आहे. मुरुडला जाण्यासाठी अलिबागला वळसा घालावा लागणार नाही.

उसर परिसरात उभारल्या जाणाऱ्या गेल कंपनीच्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या पॉलीमर प्रकल्पामुळे या मार्गाच्या कामाला गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यासाठी उसर ते पोयनाड हा मिसिंग लिंक प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतला आहे.

केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या गेल कंपनीकडून उसर येथे पॉलीमर प्रकल्पाच्या उभारणीचे काम सुरू झाले आहे. हा आशिया खंडातील सर्वात मोठा पॉलीमर प्रकल्प असणार आहे. ज्यातून १ हजार मे. टन पॉलीमतरचे उत्पादन होणार आहे. आठ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू आहे. या शिवाय याच परिसरात शासकीय वैद्यकी महाविद्यालयाची उभारणी केली जात आहे. ५०० खाटांचे रुग्णालय सुरु होणार आहे. यामुळे या परिसरातील वाहनांची वर्दळ वाढणार आहे. हीबाब लक्षात घेऊन उसर ते पोयनाड दरम्यान प्रस्तावित असलेल्या आणि लालफीतीत अडकून पडलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाला गती देण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पोयनाड ते उसर दरम्यान बैलखिंड मार्गे प्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. भुसंपादन आणि वनविभागाच्या परवानगीसाठी साडे सात कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. वनविभागाच्या मान्यततेनंतर लागलीच या मार्गाच्या कामाचे काम सुरू होणार आहे. या मार्गामुळे उसर ते पोयनाड हे पाऊण तासाचे अंतर अवघ्या दाह ते पंधरा मिनटांवर येणार आहे.

सध्या उसर येथून अलिबाग, कार्लेखिंड, पेझारी आणि पोयनाड असा प्रवास करावा लागतो. ज्यासाठी जवळपास ३० किलोमीटरचे अंतर पार करावे लागते, पण उसर ते पोयनाड मिसिंग लिंक प्रकल्पामुळे हे अंतर अवघ्या १२ ते १५ किलोमीटर येणार आहे. वडखळवरून नागाव, चौलच्या दिशेने येणाऱ्या पर्यटकांनाही या मार्ग उपयुक्त ठरु शकणार आह.

## महड अन्नछत्र अद्याप सुरळीत; भाविक ना मिळतोय बाप्पाचा प्रसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

गॅस सिलेंडरची टंचाईमुळे हॉटेल, ढाबा यांचे वांदे झाले असले तरी तालुक्यातील एकमेव अन्नछत्र असलेले महड वरदविनायक देवस्थान मर्यादित संख्येमुळे अद्याप सुरळीत सुरू आहे. महड देवस्थान संस्थान तर्फे चालवण्यात येणाऱ्या अन्नछत्रात कुपन देण्यात येतात. सोमवार ते गुरुवार ७५ भाविकांना तर शुक्रवार ते रविवार सव्वाशे भाविक अशी कुपन संख्या असते यामुळे अद्याप सुरळीत सुरू आहे.

## साळावच्या खाडीत शिडाच्या होड्यांच्या शर्यतीचा थरार

**रेवदंडा : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील आग्राव पुर्वपाडा दर्यासागर मित्रमंडळाने गुढीपाडव्याच्या दुसरा दिवशी शिडवाल्या होंड्यांची स्पर्धेची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून जपली आहे. कार्लाच्या डोंगरातील एकविरा माता कोळी बांधवाचे श्रध्दास्थान, या एकविरा मातेला नवसाचा नारळ पुर्वी कुंडलिका समुद्रखाडीमार्गे भिसे खिंडीतून एकविरा कार्लाला पालखीने पोहोचविला जात असे. त्यातूनच या शिडाच्या होड्यांच्या शर्यतींचा जन्म झाला.

एकविरा मातेच्या या नवसाचा नारळ ओटीसह पालखी असंख्य होंडयासह कुंडलिका खाडीमार्गे सुध्दा जात असत. बदलत्या काळात दळणवळणाच्या वाढलेल्या सुविधेने एकविरा मातेचा नवसाच्या नारळ, ओटीचा मार्ग बदलला. त्यावेळी पालखीस देवीच्या नवसाचा नारळ ओटी पोहोचविण्याना सुरू झालेली शिडवाल्या होंडयांच्या शर्यतीची परंपरा आजमितिस सुरू आहे. कोळी बांधव या दिवशी होंड्यांना रंगबिरंगी पताकांनी सजवून आप्त व मित्रमंडळीस कुंडलिका साळाव समुद्र खाडीत यांत्रीक होंड्यासह मौजमज्रेची लयलूट करतात.

या दिवशी रेवदंडा, कोर्लई, बोर्ली, थेरोंडा पंचक्रोशीतील कोळी बांधवाच्या यांत्रिक होंड्या मोठया संख्येने समुद्र खाडीत येतात. तसेच स्थानिकांसह पर्यटक सुध्दा मोठ्या संख्येने या शिडवाल्या होंड्यांच्या शर्यतीचा आनंद घेतात.मोठ्या संख्येने आलेल्या यांत्रिक होंड्यांची एक प्रकारे जत्राच भरल्याचे चित्र पहावयास मिळते, सोबतीला वेधुंद होत गितांच्या,वाद्यांच्या तालावर थिरकणारे कोळी बांधव दिसतात.

सजवलेल्या होड्यांतून कोळी बांधव व भगिनी बेधुंदपणे नाच आणि गाणे यांना भरती येउन कुंडलिका खाडीला उत्साहाचे उधाण दिसते. आग्राव दर्यासागर मित्रमंडळाचे पंरपरेने चालणारी शिडवाल्या होंड्यांची शर्यतीची परंपरा संपुर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. आग्राव येथील समुद्र जेटी नजीक शिडवाल्या होंड्यांची शर्यत मान्यवरांचे हस्ते निशाण फडकवून व फटाके वाजवून होते. खाडीच्या पुर्वे ला काही अंतरावरी विशेष खुणेच्या अंतरावरून होंड्यामागे फिरतात. शिडवाल्या होंड्या जाताना सहज वाऱ्यावर जातात, परंतू फिरताना कोळी नाखवाचे कसब दिसून येते. या फिरलेल्या होंड्या थेट रेवदंडा पुल व तेथून पुन्हा आग्राव जेटी असे मार्गक्रमण करतात.

या शिडवाल्या होंड्यांतील शर्यतीत प्रथम, व्दितीय, तृतीय, उत्तेजनार्थ अशी मोठी बक्षीसे व चषके देण्यात येतात.

## पोस्कोकडून आशा सेविकांना वैद्यकीय किट

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**



ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि प्रभावी बनविण्याच्या उद्देशाने पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत माणगांव तालुक्यातील आशा सेविकांसाठी आवश्यक वैद्यकीय किट वितरण कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. १६ मार्च रोजी माणगाव तहसील ऑफिस सभागृहात करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील एकूण १३७ आशा सेविकांना आवश्यक वैद्यकीय किटचे वितरण करण्यात आले.

या किटमध्ये मूलभूत वैद्यकीय उपकरणे, टॉर्च आणि बॅग यांसह एकूण १३ अत्यावश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. या साधनांमुळे आशा सेविकांना दुर्गम व ग्रामीण भागात काम करताना अधिक सोयीस्करपणे आरोग्य सेवा देणे शक्य होणार आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेस किंवा तातडीच्या परिस्थितीत या साधनांचा मोठा उपयोग होणार आहे.

ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना अधूनमधून घडत असल्याने या समस्येचा विचार करून सापांची ओळख व सर्पदंशावरील प्राथमिक उपचार या विषयावर एक माहितीपूर्ण पुस्तिका देण्यात आली आहे.

## रायगडात पिकली पिवळी कलिंगडे, 'आरोही' वाण ठरतोय आकर्षणाचे केंद्र

**पाली : प्रतिनिधी**



उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारात लालचुटूक कलिंगडे दिसू लागतात, मात्र रायगड जिल्ह्यातील घोसाळे किल्ल्याच्या परिसरात यंदा काहीतरी वेगळे पाहायला मिळत आहे. येथील शेतात चक्क 'आरोही' नावाचे पिवळा गर असणारे वैशिष्ट्यपूर्ण कलिंगड डोलत असून, पर्यटकांना आणि खवय्यांना हे कलिंगड थेट शेतातून स्वत:च्या हाताने निवडून खुडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

इतर कलिंगडांसारखेच वरतून हिरवे दिसणारे हे फळ कापल्यानंतर आतून गडद पिवळ्या रंगाचे निघते. दिसायला आकर्षक आणि चवीला अधिक गोड असलेल्या या वाणाची लागवड येथील शेतकरी ऋषिकेश म्हात्रे व प्रवीण म्हात्रे यांनी प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी केली आहे.

केवळ बाजारात मिळणारे फळ विकत न घेता, ग्राहकांनी सहकुटुंब शेतात यावे, फिरण्याचा आनंद घ्यावा आणि हवे ते फळ स्वत: निवडावे, ही संकल्पना येथे राबवली जात आहे. येत्या १७ मार्च ते २७ मार्च दरम्यान ही संधी उपलब्ध असून, ४५ रुपये प्रति किलो या दराने हे कलिंगड उपलब्ध होणार आहे.


रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने अलिबाग, पेण आणि रोहा परिसरात मोठ्या प्रमाणात तसेच इतरही ठिकाणी लाल कलिंगडाची लागवड होते. मात्र, स्वत: निवडा आणि तोडा ही संकल्पना आणि 'आरोही' (पिवळे कलिंगड) या वाणाची लागवड जिल्ह्यात अत्यंत मर्यादित ठिकाणी किंवा दुर्मिळ आहे. बहुतेक शेतकरी आपला माल घाऊक व्यापाऱ्यांना विकतात. मात्र थेट ग्राहकांना शेतात बोलावून विक्री केल्यामुळे शेतकऱ्याला चांगला भाव मिळेल. आणि पर्यटनालाही चालना मिळणार आहे. घोसाळे किल्ल्याच्या परिसरात होणारा हा प्रयोग जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांसाठी 'कृषी-पर्यटना'चा एक नवीन आदर्श ठरू शकतो. शेतकरी ऋषिकेश म्हात्रे व प्रवीण म्हात्रे यांनी सांगितले की लोकांना शेतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांना स्वतःच्या हाताने निवडलेले १००% ताजे व दर्जेदार फळ मिळावे, या उद्देशाने आम्ही पिक युअर ओन ही संकल्पना राबवत आहोत. 'आरोही' या पिवळ्या कलिंगडाचे वेगळेपण आणि शेतात फिरण्याचा आनंद पर्यकांसाठी नक्कीच नवा अनुभव ठरेल. ग्राहकांच्या प्रतिसादावर या प्रयोगशील शेतीचे यश अवलंबून आहे. जास्तीत जास्त लोकांनी या उपक्रमाला भेट द्यावी.

***पिवळ्या कलिंगडाचे (आरोही) वैशिष्ट्य आणि महत्त्व***

***पिवळ्या कलिंगडाची चव ही लाल कलिंगडापेक्षा किंचित वेगळी आणि अधिक मधूर असते. याचा गर लाल कलिंगडाच्या तुलनेत अधिक मऊ आणि रसाळ असतो. यामध्ये 'बीटा-कॅरोटीन' भरपूर प्रमाणात असते, जे शरीरात व्हिटॅमिन 'ए' तयार करण्यास मदत करते. तसेच हे अँटी-ऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे. हे वाण सामान्य बाजारपेठेत सहज उपलब्ध होत नाही, त्यामुळे ग्राहकांसाठी हा एक वेगळा अनुभव ठरतो. बहुतांश पिवळ्या कलिंगडांमध्ये बियांचे प्रमाण लाल कलिंगडापेक्षा कमी असते.***

## मुरुड नगर परिषद सफाई कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुरुड नगर परिषदेचे सफाई कर्मचारी यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

मुरूड नगर परिषदेचे सफाई कर्मचारी हे तुटपुंज्या वेतनात सुद्धा मुरुड शहराची स्वच्छता अबाधित ठेवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्यांच्या उत्कृष्ट सफाई मुळे पर्यटकसुद्धा मोठ्या प्रमाणावर येऊन स्थानिक नागरिकांना स्वयंरोजगार देऊन जात असतात.

ना. आदिती तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात ५५ सफाई कर्मचारी यांना संपूर्ण जीवनावश्यक वस्तूंचे कडधान्य किट वाटप करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. या किटमध्ये तांदूळ, तेल, मसाला, साखर, आदी वस्तू देण्यात आलेल्या आहेत. यावेळी मुरुड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर व इतर उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे रिटघर, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे रिटघर, तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| ४० | १ | ०-६८-६० | ०-०४-०० | ०-७२-६० | ९.३० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०३/२०२६

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – चिखले, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | भोगवटाधारक | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १११ | १ | समिर अनिल नेरुरकर<br>अनिल माधव नेरुरकर | ०-४०-४० | २.१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुद्दतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. १८/०३/२०२५
पनवेल

सही/-
**ॲड. वाय.एस. भोपी**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल : ९८२०२७३६९१.**

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.७५/८५/२०२६ दिनांक : १८/०३/२०२६

**निविदा सूचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | PMC/WS/43/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ईच्छापुर्ती गणेश मंदिर येथील पाणी पुरवठा केंद्रांतर्गत १६० KVA क्षमतेचे डिझेल जनरेटर संच पुरविणे, बसविणे आणि कार्यान्वित करणे (दुसरी बोली).. | रु.२५,२९,२५१/- |

वरील ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २०/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**(गणेश शेटे)**
अतिरिक्त आयुक्त -१
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil. khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ६४/२०२६,

१) श्री. सिताराम नवश्या वाघमारे
रा. उबंरे, पो. खांबेवाडी,
ता. खालापूर, जि. रायगड — वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत उबंरे, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. सिताराम नवश्या वाघमारे , रा. उबंरे, पो. खांबेवाडी, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील कै. हरि नथु कातकरी यांचा मृत्यू दिनांक ०५/११/१९८० रोजी उबंरे, पो. खांबेवाडी,ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि १८/०३/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्कयानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक:- १८/०३/२०२६**

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ६५/२०२६,

१) श्री. किशोर सखाराम शिंदे
रा. कारगांव, पो. खांबेवाडी,
ता. खालापूर, जि. रायगड — वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत उबंरे, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. किशोर सखाराम शिंदे, रा. कारगांव, ता. खालापूर, जि. रायगड** (अपिलार्थी) यांनी यांचे आजोबा कै. घोंडीबा भिवाजी चव्हाण यांचा मृत्यू दिनांक १०/०६/१९९० रोजी कारगांव ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि १८/०३/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्कयानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक:- १८/०३/२०२६**

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्यांचे मालकांकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पोसरी गांव, ता. पनवेल जि. रायगड, येथील**

मालकाचे नाव व जमिनीचा तपशील:
१) श्री. अनिल खंडू पाटील २) सौ. निता नामदेव ठाकूर उर्फ कल्पना नामदेव ठाकूर ३) सौ. कमल महेंद्र पाटील उर्फ सौ. कमल खंडू पाटील ४) श्री. सुनील खंडू पाटील ५) श्री. मंगेश काळुराम तवळे ६) सौ. शोभा रोहिदास जाधव ७) श्री. उमेश काळुराम तवळे ८) श्रीमती तारामती हरीशचंद्र पाटील ९) श्री. प्रफुल्ल हरीशचंद्र पाटील १०) श्री. संजय हरीशचंद्र पाटील ११) सौ. अश्विनी अनंत हाडप

| सर्व्हे नं / हिस्सा नं | क्षेत्रफळ |
|---|---|
| ७०/१ | १-८०-०० |

वरील वर्णनाच्या शेतीजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांची खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे.


वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.


दि. १७ मार्च २०२६

सही/-
**ॲड. दिपिका विष्णुदास मुखेकर**
Add: Office No. 13, ground Floor, Bhumiraj Manor C.H.S. plot No.3, Sector 14, Sanpada, Navi Mumbai 400705
Contact No:8879182383
mukhekardeepika@gmail.com


धूतपापेश्वर
आयुर्वेद क्षेत्रातील १५० हून अधिक वर्षे
नववर्ष आणि
गुढी पाडव्याच्या
हार्दिक
शुभेच्छा
श्री धूतपापेश्वर लिमिटेड
शास्त्रोक्त, मानकीकृत,
सुरक्षित व उत्तम गुणवत्तेच्या
आयुर्वेद औषधांचे निर्मिति
ISO Certificate
GMP Certificate
श्री धूतपापेश्वर
मानक
• पेटंट अॅण्ड प्रोप्रायटरी • आयुर्वेदिक सुपर स्पेश्यॅलिटी प्रॉडक्टस् • प्रायमरी हर्ब टैबलेटस् • सुवर्णकल्प • गुग्गुळकल्प
• कूपीपक्व रसायन • लोह मण्डूर • गुटी वटी • रसकल्प • पर्पटी कल्प • पिष्टी • प्रवाही • अवलेह • तैल
• भस्म • पोट्टली रसायन • आसव-अरिष्ट-काढा-कषाय • भेषजामृत • चूर्ण/चूर्ण वटी
१३५, नानुभाई देसाई रोड, खेतवाडी, मुंबई -४०० ००४.
फोन नं.:+९१-२२-६९७१ ५००० /०१ /०२
E-mail: healthcare@sdlindia.com
Toll Free: 1-800-2 AYUSH
(Dial AYUSH as in 29874
during working hrs 9.00 to 17.00)
www.sdlindia.com
SDL Product Advt/Gudhipadva/Ramprahar 16x25cm/M/N/0326


SIMRAN MOTORS
EXPERIENCE THE NEW WAY OF LIFE
परंपरा, संस्कृती आणि प्रेमाचे
हे पर्व-तुम्हाला व कुटुंबियांना
मराठी नववर्ष
गुढी पाडवा
सणाच्या सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा !!
MARUTI SUZUKI COMMERCIAL
MARUTI SUZUKI ARENA
NEXA
MARUTI SUZUKI ARENA | NEXA | TRUE VALUE | HONDA
हेड ऑफिस : प्लॉट नं. २-८, सेक्टर १५, गार्डन हॉटेल समोर, जुना मुंबई - पुणे हायवे, पनवेल, महाराष्ट्र - ४१०२०६
PANVEL 9223589145
AIROLI 9223161411
ALIBAG 9223161461
MANGAON 8691988892
MAHAD 9767006043
CHOWK 9373830579
KARJAT 9223181114
WADKHAL 9223161473


Happy
Gudi Padwa
May the Gudi Padwa festivities fill your
home with warmth and positivity.
शु | भे | च्छु | क
रवि डायवेअर
कंपनी प्रा. लिमिटेड
ऑफीस : १२१, अटलांटा, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१
फोन : २२८५१००७, फॅक्स : २२०२९१४६
फॅक्टरी : प्लॉट नं. जी-१२, एमआयडीसी तळोजा, जि. रायगड - ४२१२०७. फोन : २७४१२५१२


हे नवीन वर्ष तुम्हा सर्वांना, समृद्धी प्रगती आणि यश घेऊन येवो..
आपणास व आपल्या परिवारास गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!
चैत्राची सोनेरी पहाट,
नवा आरंभ नवा विश्वास,
नव्या वर्षाची हीच खरी सुरुवात..!
नववर्ष
आणि
गुढी
पाडवा
निमित्त
सर्वांना मंगलमय
शुभेच्छा!
बांधकाम साहित्य पुरवठ्यात गुणवत्ता आणि सेवेत अग्रणी
विश्वासाच्या भक्कम पायावर उभे असलेले नाव
tpv
Cement & other construction materials
TPV SALES LTD.
FORMERLY THAKKAR POPATLAL VELJI SALES LTD.
+91 9833367777 / 022-27453346 | www.tpvindia.com
Tulsi Pooja, Office no.2, 1st floor, Sector - 1,
Plot 5 & 7, New Panvel (E) 410206, Maharashtra, India.

# रायगड प्रेस क्लबच्या पुरस्कारांची घोषणा; ८ एप्रिलला पनवेलमध्ये होणार भव्य गौरव सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड प्रेस क्लबची महत्त्वपूर्ण जिल्हा कार्यकारिणी सभा नुकताच पनवेल येथे झाली. या सभेत रायगड प्रेस क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२६ सालच्या विविध प्रतिष्ठित पत्रकारिता पुरस्कारांची रायगड प्रेस क्लबच्या वतीने अधिकृत घोषणा करण्यात आली असून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत ८ एप्रिल रोजी पनवेल येथे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा भव्य गौरव सोहळा होणार आहे.

सभा रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोकण विभागीय सचिव मनोज खांबे, माजी अध्यक्ष विजय मोकल, अनिल भोळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, सरचिटणीस दर्वेश पालकर, उपाध्यक्ष मोहन जाधव, मुख्य संघटक शशिकांत मोरे, महिला संघटिका सीमा मोरे, संघटक दिनेश सुतार, विभागीय सचिव शिवराज पार्टे, जनसंपर्क अधिकारी कमलेश ठाकूर, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांच्यासह जिल्हाभरातील पदाधिकारी, तालुका अध्यक्ष व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर झालेले पुरस्कार व मानकरी:**

आचार्य अत्रे राज्यस्तरीय संपादक सन्मान: कमलेश सुतार (संपादक, झी २४ तास), – रायगड प्रेस क्लब जीवन गौरव सन्मान: उमाजी केळुस्कर (अलिबाग), निशिकांत जोशी स्मृती पत्रकार सन्मान: नरेश पवार (पेण), क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला पत्रकार सन्मान: श्रीमती तृप्ती पालकर (पनवेल), दीपक शिंदे स्मृती व्हिडिओ जर्नालिस्ट सन्मान: स्वप्नील दुधारे (पनवेल), प्रकाश काटदरे स्मृती निर्भीड पत्रकार सन्मान: रवींद्रनाथ ओव्हाळ (पाली), संतोष पवार स्मृती युवा पत्रकार सन्मान: शिवराज पार्टे (पोलादपूर), अ‍ॅड. जनार्दन पाटील स्मृती शोध पत्रकार सन्मान: विद्यानंद ओव्हाळ (कर्जत), डॉ. सचिन पाटील स्मृती पत्रकारिता सन्मान: शशिकांत मोरे (रोहा), प्रेस क्लब ॲक्टिव्ह जर्नालिस्ट सन्मान: चंद्रहास नगरकर (महाड) व अमूलकुमार जैन (मुरूड), रायगड प्रेस क्लब विशेष सन्मान: अजय कदम (माथेरान) व रवींद्र मोरे (खोपोली), रायगड प्रेस क्लब सामाजिक कार्यकर्ता सन्मान: सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था (कोलाड) व हेल्प फाउंडेशन (खोपोली), रायगड जिल्हा श्रमिक पत्रकारिता सन्मान:हरेश साठे (पनवेल) व विश्वजीत लुमन (रोहा)

### रायगड प्रेस क्लबचा २१वा वर्धापन दिन सोहळा

रायगड प्रेस क्लबचा २१ वा वर्धापन दिन आणि पत्रकार सन्मान सोहळा बुधवार, ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे संयोजन 'पनवेल महानगर प्रेस क्लब' करणार आहे.

## रस्ता क्रॉस करणाऱ्याचा अपघातात मृत्यू

**पनवेल :** रस्ता क्रॉस करणाऱ्या ४१ वर्षीय वेटरला अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १८ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

धनेश्वर चंद्रशेखर दास हा कोन गाव येथे राहत असून तो मिठास स्वीट मार्टसमोरील रस्त्यावर जुना मुंबई पुणे महामार्ग कोनगाव येथे पायी रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने येऊन धनेश्वर याला धडक दिली. या धडकेत त्याच्या डोक्याला, खांद्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.
















hiranandani communities
a niranjan hiranandani initiative
MahaRERA No.: Pavilion: PR1270002501589
https://maharera.mahaonline.gov.in
PAVILION
POWAI IS MAGNIFICENT,
PANVEL WILL BE
MONUMENTAL
HIRANANDANI
FORTUNE CITY
PANVEL
LAUNCHING
3 & 4 BHKs | ₹1.91 CR. Onwards (All Incl.)
022 48964999
Image Used for Representational Purpose Only
The project has been registered via MahaRERA registration number: Pavilion: PR1270002501589, and is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). *T&C Apply.